Most government and government-aided institutions (schools and colleges) have volunteer NSS units, and private institutions are encouraged to have NSS volunteers. A unit typically comprises 20–0 students. They are managed internally by a responsible party from the school (or college), who reports to the regional NSS coordinator. Most institutions do not have a separate uniform for NSS volunteers.

**Camps**

Camps are held annually, funded by the government of India, and are usually located in a rural village or a city suburb. Volunteers may be involved in such activities as:

1. Cleaning
2. Afforestation
3. Stage shows or a procession creating awareness of such issues as social problems, education and cleanliness
4. Inviting doctors for health camps

There are no predefined or preassigned tasks; it is left up to the volunteers to provide service in any way that is feasible. Camps typically last between a week and 10 days, although camps for shorter periods are also conducted.

**Typical projects:**

1. Adoption of villages
2. Construction and repair of roads
3. Afforestation

Literacy

4. classes
5. Water conservation
6. Plastics eradication
7. Eye Donation
8. Tree Plantation
9. Blood Donation
10. Social Issue Awareness Camp



# LIST OF INTERNATIONAL AND NATIONAL DAYS/WEEKS TO BE OBSERVED BY NATIONAL SERVICE SCHEME

| Sr. No. | Day's | Date |
|---|---|---|
| 1. | National Youth Day | 12 January |
| 2. | Republic Day | 26 January |
| 3. | Martyrs Day | 30 January |
| 4. | International Women Day | 8 March |
| 5. | World Health Day | 7 April |
| 6. | Anti Terrorism Day | 21 May |
| 7. | World No Tobacco Day | 31 May |
| 8. | World Environment Day | 5 June |
| 9. | World Population Day | 11 July |
| 10. | Independance Day | 15 August |
| 11. | Sadbhavna Day | 20 August |
| 12. | International Literacy Day | 8 September |
| 13. | International Peace Day | 15 September |
| 14. | NSS Day | 24 September |
| 15. | National Blood Donation Day | 1 October |
| 16. | Communal Harmony Day | 2 October |
| 17. | National Integration Day | 19 November |
| 18. | World Aids Day | 1 December |
| 19. | International Volunteer Day | 5 December |
| 20. | World Human Right Day | 10 December |

| Sr. No. | Weeks | Date |
|---|---|---|
| 1. | National Youth Week | 12 - 19 January |
| 2. | Van Mahotsava Week | 1-7 July |
| 3. | International Literacy Week | 8-14 July |
| 4. | Quami Ekta Week | 19-25 November |

## ogram Officer

| | Name | Qualification | Period of work |
|---|---|---|---|
| 1 | Prof. R. S. Satbhai | M.A. SET, NET | 15.06.2018 to Till Date |
| 2 | Prof. Smt. S. M. Khude | MA, NET | 10/07/2013 to Till Date |
| 3 | Dr. S. G. Gopne | M.Com, Ph.d | 15/06/2019 to till date |

## SS Advisory Committe

| | Name | Designation |
|---|---|---|
| 1 | Pri. Dr. S. R. Nimbore | Chairmen |
| 2 | Vice Pri. Dr. B. N. Mutkule | Member (Ex.P.O.) |
| 3 | Dr. R. S. Satbhai | Secretory |
| 4 | Dr. S. G. Gopane | Member |
| 5 | Dr. S. M. Khude | Member |
| 6 | Shri. Sunil Sanap | Member (Social Worker) |
| 7 | Ku. R. M. Hambarde | Student Representative |





# रक्तदान करताना महाविद्यालयीन विद्यार्थी स्वयंसेवक

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या संयुक्त जयंती निमीत्त महाविद्यालय व रावन फाऊंडेशन, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन दि.९ एप्रिल २०२३ उद्घाटक प्राचार्य सोपानराव निंबोरे, रावन फाऊंडेशनचे सुहास पगारे निखील शिंदे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.रवि सातभाई, डॉ. सुहास गोपणे यांनी केले. सर्व स्वयंसेवाकांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. यात १०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## लोकमत



### १०५ जणांनी केले रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

आष्टी : रावण सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथील ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

प्राचार्य डॉ. सोपानराव निंभोरे, पोलिस निरीक्षक अभिजित चाटे, प्रा. रवी सातभाई यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी १०५ दात्यांनी रक्तदान केले. शिबिर यशस्वीतेसाठी अध्यक्ष सुहास पगारे, तालुका संघटक निखिल शिंदे, तालुकाध्यक्ष मोहित कांबळे, तालुका उपाध्यक्ष विजय शिंदे, रावण सोशल फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

Hello Beed
Page No. 3 Apr 11, 2023
Powered by: erelego.com

## मराठवाडा साथी

### आष्टी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले जयंतीनिमित्त १०५ रक्तदात्यांनी केले रक्तदान



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी शहरातील सामाजिक संस्था रावण सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त व महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथील ॲड बी डी हंबर्डे महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ सोपानराव निंभोरे, पोलिस उपनिरीक्षक अभिजीत चाटे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी प्रा रवि सातभाई, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, ॲड किशोर निकाळजे आदी मान्यवर उपस्थित होते .

यावेळी रक्तदान शिबिरामध्ये एकुण १०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.आष्टी शहरात सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारी रावण सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये १०५ युवक रक्तदात्यांनी रक्तदान केले रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी रावण सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष सुहास पगारे,तालुका संघटक निखिल शिंदे,

तालुकाध्यक्ष मोहित कांबळे, तालुका उपाध्यक्ष विजय शिंदे, व रावण सोशल फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

Beed Edition
Apr 10, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com





# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव

दिनांक १४ एप्रिल २०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमीत्त महाविद्यालयात ाष्ट्रीय सेवा योजना विभागाने जयंती उत्सवाचे आयोजन केले होते. या वेळी राज्यशास्त्र विभागाचे डॉ. भगवान ाधमारे यांनी स्वयंसेवकांना विस्तृत मार्गदर्शन केले या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, पप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रवि सातभाई, डॉ. सुहास गोपणे पस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी सुहास गोपणे यांने केले तर आभार शुभांगी खुडे यांनी यक्त केले. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. याच दिवशी एकदिवसीय श्रम शिबीर संपन्न ाले.








## महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग युथ क्लायमेट चेंज कॉन्फरन्स

२४ – २५ मे २०२३ ला पुणे येथील हॉटेल प्रेसिडेंट या ठिकाणी महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांनी युज क्लायमेट चेंज कॉन्फरन्स चे आयोजन केलेले होते या कॉन्फरन्स मध्ये राष्ट्रीय सेवा योजना ट समन्वयक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रवि सातभाई हे सहभागी झाले होते तसेच दिनांक २६ व २७ रोजी पुणे विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र राज्य यांनी पंचप्रण याची मेरी माटी मेरा देश या थिमवर आधारित राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कार्यशाळेचे आयोजन केलेले होते यामध्ये सुद्धा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रवी सातभाई यांनी सहभाग नोंदवला.









# आंतरराष्ट्रीय योग दिन

दिनांक २१ जुन २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमीत्त महाविद्यालयात योगाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते या साठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सर्व स्टाफ यांनी योगाचे धडे घेतले या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निबोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. क्रिडा संचालक डॉ संतोष वनगुजरे व योगगुरू भाऊसाहेब जगताप यांनी योगाचे धडे व मार्गदर्शन केले. हसत खेळत योगा हा उपक्रम भाऊसाहेब जगताप यांनी महाविद्यालयात राबवला.





YOGA





# राजश्री छत्रपती शाहु महाराज जयंती व करियर मार्गदर्शन शिबीर

दिनांक २६ जून २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली होती या जयंती कार्यक्रमाबरोबरच करिअर गायडन्स प्रोग्राम सुद्धा महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजन करण्यात आलेला होतं. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती सुप्रिया सुपेकर ह्या उपस्थित होत्या आणि त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय सखोल असं मार्गदर्शन केलं. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व सर्व सहकाऱ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेची अध्यक्ष माननीय किशोर नाना हंबर्डे



हे होते तर प्रमुख पाहुण्यांमध्ये संचालक महेशजी चौरे प्रसिद्ध उद्योगपती अशोक भोसले हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ रवी सातभाई यांनी व्यक्त केले







## पेक्स द्वारा आयोजीत CSC की सेवाओंका शुभारंभ तथा शेतकरी मेळावा

भारत सरकारच्या सी.एस.स्सी सेवा प्रकल्पाच्या उद्घाटनाचे लाईव्ह प्रक्षेपण व शेतकरी मेळावा महाविद्यालयात दिनांक २१ जुलै २०२३ रोजी आयोजीत करण्यात आला होता. ऑनलाईन प्रणाली द्वारे आपल्या भारत देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी मार्गदर्शन केले. या नंतर लगेच तालुकास्तरीय शेतकरी मेळाव्याचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजन केले होते यात डॉ.एम.एस.पवार यांनी स्वयंसेवकांना व शेतकरी वर्गाला मार्गदर्शन केले.



### मराठवाडा साथी

# शेतकऱ्यांनी नॅनो तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा-डॉ.पोवार

आष्टी/प्रतिनिधी

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे ॲड बी डी हंबर्डे महाविद्यालय आष्टी येथे दि.२१ जुलै रोजी कृषी विभाग पंचायत समिती आष्टी, इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कॉऑपरेटिह लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आमची माती आमची माणसं शेतकरी मेळाव्यात डॉ एम एस पोवार बोलत होते.ते पुढे म्हणाले की, आज शेती खूप प्रगत झाली आहे आता शेती सुध्दा ने तंत्रज्ञान स्विकारून केली पाहिजे. आज नॅनो तंत्रज्ञानामुळे एक बॅग युरिया एक लिटर सारखा आहे.



या नॅनो तंत्रज्ञानामुळे शेतीची उत्पादकता व पैशाची बचत सुध्दा होते तेव्हा त्याचा स्वीकार करण्याचे त्यांनी सांगितले. या शेतकरी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे हे होते. ते बोलताना म्हणाले की आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला तर शेतकरी आत्महत्यां कमी होतील. मी स्वतः आधुनिक पध्दतीने शेती करतो व माझी शेती फायदेशीर पण आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, कृषी अधिकारी नितीन राऊत, विस्तार अधिकारी कृषी बी यू काळे,पॅनल तांत्रिक नरेगा आकाश राऊतमारे, इफकोचे सय्यद व हंबर्डे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे व आष्टी पंचक्रोशीतील कृषी सुविधा केंद्राचे मालक व शेतकरी उपस्थित होते.

प्रगतीशील शेतकरी होण्याचे सर्वांचेच स्वप्न असते. शेतकऱ्यांना आता शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होत असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यास शेती सहज सोपी व फायदेशीर होवू शकते असा मतप्रवाह या चर्चासत्रात दिसून आला. या नॅनो तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना मदत होईल हे निश्चित.

॥ श्री शिवाय नमस्तुभ्यं ॥









## आमची माती.. आमची माणसं.. उपक्रम

२१ जुलै २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये आमची माती आमची माणसं हा उपक्रम राबविण्यात आला हा उपक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागाने वृक्षारोपण करण्यासाठी राबवला होता या उपक्रमामध्ये प्रामुख्याने कृषी तज्ञ डॉ. पवार तसेच कृषी अधिकारी माननीय तरटे साहेब तसेच कृषी विभाग आष्टी तालुका चे वरिष्ठ पदाधिकारी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस आर निंबोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रवी सातभाई डॉ. सुहास गोपने यांच्या प्रयत्नातून साकार झाला. याच दिवशी कार्यक्रम अधिकारी डॉ. रवि सातभाई यांचा वाढदिवस असल्याने लावलेली सर्व झाडे त्यांना दत्तक देण्यात आली व त्यांचा या वृक्षासमवेत सत्कार करण्यात आला.







## बालविवाह मुक्त बीड जिल्हा शपथ समारंभ

दिनांक २७ जुलै २०२३ रोजी मा. कलेक्टर यांच्या आदेशानुसार महाविद्यालयात बालविवाह प्रतिबंध शपथ देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवकांनी सर्वांना बालविवाह कायद्यांची माहिती दिली. या कार्यक्रमांची जिल्हाधिकारी कार्यालयात, बिडने विशेष दखल घेतली होती. बातमीतील फोटो महाविद्यालयाचा आहे.

लोकमत

जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची संकल्पना : दर सोमवारी उपक्रम

### शाळांच्या परिपाठात बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञेचा आवाज

लोकमत न्यूज नेटवर्क

बीड : जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या संकल्पनेतून जिल्हाभरातील प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधून दर सोमवारी प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना बालविवाह प्रतिबंधाची प्रतिज्ञा दिली जात आहे. यामुळे जिल्हाभरात या उपक्रमाबाबत सर्वांना उत्सुकता निर्माण झाली आहे.

या उपक्रमांमधून जिल्हाभरात सकारात्मक पद्धतीने जनजागरण होताना दिसत आहे. दर सोमवारी शाळांमधून या प्रतिज्ञेचे सूर सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. बालविवाह रोखण्यासाठी ८ मार्च २०२३ रोजी महिला दिनाचे निमित्त साधून बालविवाह निर्मूलन आराखडा तयार करण्यात आला.

जिल्हा कृती दलाची दर महिन्याला जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होते. यावेळी जिल्ह्यातील सर्व शाळा, माध्यमिक विद्यालय, उच्च माध्यमिक शाळेत दर सोमवारी शालेय परिपाठामध्ये बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी दिल्या आहेत.

शालेय परिपाठात दर सोमवारी बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा सर्व शाळांतून घेतली जात आहे.

बीड जिल्ह्यात बालविवाह होत असल्यास चाईल्ड लाईन क्रमांक १०९८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुधीर ढाकणे, बीड यांनी केले आहे.



शहरातील शाळेत बालविवाह प्रतिबंधाची प्रतिज्ञा घेताना विद्यार्थी.

#### एकच नारा, 'बालविवाहमुक्त बीड जिल्हा'



१ एकच नारा, 'बालविवाहमुक्त बीड जिल्हा' 'आम्ही बीडकर अशी प्रतिज्ञा करतो की, मुलगी असेल तर १८ वर्षांच्या आत व मुलगा असेल तर २१ वर्षांच्या आत आम्ही बालविवाह करणार नाही.

२ बालविवाहाच्या कोणत्याही कार्यात सहभागी होणार नाही; तसेच बालविवाहास प्रत्यक्षात या अप्रत्यक्ष मदत करणार नाही. बालविवाहाने मुलांच्या शैक्षणिक, सामाजिक व शारीरिक आयुष्यावर दुष्परिणाम होतात याची आम्हाला जाणीव आहे.

३ बालविवाह हा कायदेशीर गुन्हा असून, त्यासाठी तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. बालविवाहाची माहिती मिळाल्यास आम्ही १०९८ या क्रमांकावर संपर्क साधू. या नंबरवर संपर्क साधणाऱ्या व्यक्तीचे नाव, पत्त्याची आवश्यकता नसून माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते, याची मला माहिती आहे.

४ या सामाजिक कामासाठी आम्ही प्रशासनास संपूर्ण सहकार्य करू. आम्ही आमच्या गावात आजूबाजूला शहरात बालविवाह होणार नाही याची दक्षता घेऊ. सर्वांचा एकच नारा 'बालविवाहमुक्त बीड जिल्हा', जय हिंद जय महाराष्ट्र'... अशी प्रतिज्ञा विद्यार्थी घेत आहेत.

Helo Beed
Page No. 4 Aug 03, 2023
Powered by: erelego.com





# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जागृती रॅलीचे आयोजन

२८ जुलै २०२३ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जागृती रॅलीचे महाविद्यालयामध्ये आयोजन करण्यात आलं होतं केंद्र सरकारने यासाठी विशेष पुढाकार घेतला होता आणि प्रत्येक महाविद्यालयामध्ये एनएपी ची अंमलबजावणी संदर्भात रॅली काढावी असे आदेश दिले होते त्याला अनुसरून हि रॅली गावामध्ये काढण्यात आली आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक अतिशय उत्स्फुर्तपणे या रॅलीमध्ये सहभागी झाले. रॅली यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सोपानराव निंबोरे, संस्थेचे संचालक डॉ. महेश चौरे उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे तसेच सर्व कार्यक्रमाधिऱ्यांनी मेहनत घेतली







## लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे जयंती

दि. ०१ ऑगस्ट ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व अण्णाभाऊ साठे यांची संयुक्त जयंती आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे हे होते. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ राजाराम सोनटक्के त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला तर डॉ भगवान वाघमारे यांनी लोकमान्य टिळक यांचे जिवन व चरीत्राची स्वयंसेवकांना ओळख करून दिली.



लोकमान्य बाळगंगाधर टिळक



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे







# हर घर तिरंगा

दि. १३ व १४ ऑगस्ट २०२३ रोजी हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये **ध्वजवंदना** करण्यात आले याप्रसंगी **महाविद्यालयातील** सर्व विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक मोठ्या उत्स्फुर्तपणे सहभागी झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. **सोपानराव** निंबोरे यांच्या हस्ते ध्वजाला मानवंदना देण्यात आली. ध्वज **फडकवण्यात** आला त्यानंतर राष्ट्रगान होऊन भारतीय तिरंग्याचे महत्त्व व प्रत्येकाच्या धरावर तिरंगा कशा **पद्धतीने** प्रथम फडकवण्यासाठी सर्व **स्वयंसेवकांनी** आणि विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले पाहिजे याबाबत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रवी सातभाई यांनी मार्गदर्शन केले व राष्ट्रहिता सर्वपरी या पद्धतीची शपथ सर्व विद्यार्थ्यांना दिली.







# स्वातंत्र्य दिवस साजरा

१५ ऑगस्ट २०२३ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिवस महाविद्यालयांमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी संस्था पदाधिकाऱ्यायांसोबत आपला एक फोटो घेऊन अतिशय उत्कृष्ट असं या संपूर्ण १५ ऑगस्ट च्या कार्यक्रमाचे नियोजन केलेले दिसून येत. संस्थेच्या सर्व शाखांनी एकत्र हा दिवस साजरा केलेला होता आणि हे करण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी खूप मेहनत घेतलेली होती त्यांच्यावर संस्था अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे यांनी कौतुकाची थाप टाकली. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे हे सुद्धा उपस्थित होते










## विद्यापीठ वर्धापन दिन

दिनांक २३ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये विद्यापीठ वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात येऊन सर्व विद्यार्थ्यांनी ध्वजाला मानवंदना दिली. आणि त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धा मध्ये जे विजेते विद्यार्थी होते त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला व त्यांना सन्मानपत्र देण्यात आले.







# ग्रीन क्लब समन्वयक कार्यशाळा

२५ ऑगस्ट २०२३ रोजी बंकट स्वामी महाविद्यालय बीड या ठिकाणी ग्रीन क्लब महाविद्यालयीन समन्वयक कार्यशाळा घेण्यात आली होती या कार्यशाळेमध्ये मास्टर ट्रेनर म्हणून महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व बीड जिल्ह्याचे गट समन्वयक डॉ. रवी सातभाई यांनी कार्य केले. यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा समन्वयक प्रा. दैतकर अरूण, मराठवाडा विभागीय पाणी फाउंडेशन समन्वयक राहुल गिरी प्रा. मिर्गणे सर हे उपस्थित होते.



लोकप्रभा

श्री बंकटस्वामी महाविद्यालयात ग्रीन क्लब समन्वयक प्रशिक्षण कार्यशाळा



वार-रविवार दि.२७-०८-२०२३

श्री बंकटस्वामी महाविद्यालयात ग्रीन क्लब समन्वयक प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



पुण्य नगरी

## बंकटस्वामी महाविद्यालयात ग्रीन क्लब प्रशिक्षण कार्यशाळा

बीड/प्रतिनिधी: येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयात ... ग्रीन क्लब समन्वयक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची मूल्ये रुजावी याकरिता ग्रीन क्लब स्थापन करण्यात येईल.महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थांच्या परिसरात पाणी, कचरा, ऊर्जा याचा प्रभावी वापर ... या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून बीड ... मधुकर वाघ ... कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विवेक मिरगणे उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे तसेच ...

Aug 27, 2023 Page No. 02
Powered by eReleGo.com





## मराठवाडा मुक्ती संग्राम कृतज्ञता रथयात्रा

दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेद्वारे आयोजित मराठवाडा मुक्ती संग्राम रथयात्रा आली होती या रथयात्रीची राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मोठ्या उत्स्फुर्तपणे स्वागत केले या कार्यक्रमानिमित्त संस्था अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे संस्था सचिव अतुल शेठजी मेहर संस्था कोषाध्यक्ष डॉ. गणेश पिसाळ विद्यार्थी, परिषदेचे देवगिरी प्रांत मंत्री डॉ. नागेश गलांडे व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीकरण्याकरीता डॉ. रवि सातभाई व सर्व स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.







# शिक्षक दिन

५ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते या आयोजनामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी अतिशय उत्तमरीत्या सहभाग घेतला स्वयंसेवकांनी आपल्या शिक्षकांबद्दल मनोगत व्यक्त केले. शिक्षकांच्या कार्याबद्दल त्यांच्या ज्ञानदानाच्या कार्याबद्दल त्यांचा यथोचित सन्मान करून सर्व विद्यार्थ्यांनी त्यांना मानवंदना दिली याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉक्टर सोपानराव निंबोरे सर प्रमुख वक्त्या डॉ. स्वाती सुडके मॅडम प्रा. सचिन कल्याणकर हे उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.







## आर्थिक साक्षरता कार्यशाळा

९ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजने च्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळेचा आयोजन करण्यात आलेलं होतं. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर कसं होता येईल यासाठी डॉ. सुर्जना मामीदा यांनी मार्गदर्शन केलं या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे हे होते यावेळी उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब मुटकुळे, अविनाश कदले हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंगेश शिरसाठ यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुहास गोपने यांनी केले










## मेरी माटी..मेरा देश अभियान

१३ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयात मेरी माटी..मेरा देश अभियानाची सुरुवात झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी अमृत कलश पुजन करून त्यात माती टाकुन या अभियानाचे महाविद्यालयात उद्घाटन केले. हे अभियान जवळपास महिनाभर राबविण्यात आले. संकलित अमृत कलश विद्यापिठास सुपुर्द करण्यात आला. या साठी सर्व स्वयंसेवाकांनी त्यांच्या गावातील अमृत कलश महाविद्यालयात जमा केले होते.







## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन - वक्तृत्व स्पर्धा

१४ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून तहसील कार्यालयाच्या वतीने व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचा आयोजन करण्यात आलेला होता या स्पर्धेच्या आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी विशेष सहकार्य केलेलं होतं इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. तहसीलदार माननीय प्रमोद गायकवाड सर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर संस्था अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे हे विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यासाठी निरोप समारंभासाठी उपस्थित होते.









## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन - तंबाखु मुक्तीची शपथ

१७ सप्टेंबर २०२३ रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या दिना निमित्ताने महाविद्यालयांमध्ये ध्वजवंदन करण्यात आले तसेच तंबाखूमुक्तीची शपथ यांनी याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी घेतली यावेळी संस्थेच्या सर्व शाखांचे विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला आणि हा तंबाखूमुक्तीचे महत्त्व पटवून देण्यासाठी सर्वांनी परत गट चर्चेच्या माध्यमातून सुद्धा प्रयत्न केले.









## सरपंच परिषद

दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सरपंच परिषदेचे आयोजन करण्यात आलेला होता आणि या परिषदेच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सर्व स्वयंसेवकांनी आष्टी तालुक्यातील सर्व सरपंचांना निमंत्रण दिले, सर्व गावांमध्ये व्हिजिट दिल्या, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसेवक यांच्या सोबत चर्चा केली, ग्रामीण लोकांच्या समस्या समजून घेतल्या आणि त्यानंतर या सरपंच परिषदेमध्ये जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावं यासाठी सर्वांना विनंती केली. या सरपंच परिषदेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी माननीय रविंद्र इंगोले, जलदूत तथा मनरेगा राज्य प्रशिक्षक, यशदा,



पुणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच आष्टी पंचक्रोशीतील मा. दत्ता काकडे, मा. राजेंद्र गर्जे साहेब हे सुद्धा उपस्थित होते. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. किशोर नाना हंबर्डे यांनी भूषविले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.







## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती - एक दिवसीय श्रम शिबीर

**दिनांक** २ ऑक्टोंबर २०२३ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या संयुक्त जयंती **कार्यक्रमानिमित्त** महाविद्यालयामध्ये सकाळी स्वच्छता शिबिर घेण्यात आले आणि त्यानंतर या दोन्हीही **महापुरुषांना** मानवंदना देण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे सर, व्यासपीठावरती प्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे उपप्राचार्य डॉ. अविनाश कंदले तसेच प्रमुख व्याख्याते डॉ. दत्तात्रय मुंडे हे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मेहनत घेतली सर्वात महत्त्वाचं म्हणजे **स्वच्छतेचा** संदेश **देणाऱ्या** महात्मा **गांधीजींची** जयंती राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी एकदिवसीय शिबिराच्या माध्यमातून **महाविद्यालयीन** परिसर व तहसील परिसर स्वच्छता **मोहिमेच्या** माध्यमातून साजरा केला ही एक विशेष आनंदाची गोष्ट होती









## जागतिक अन्नदिवस

२० ऑक्टोंबर २०२३ राष्ट्रीय पोषण सप्ताह निमित्ताने महाविद्यालयामध्ये अन्न हेच पूर्णब्रह्म कार्यक्रमाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजन करण्यात आले होते यामध्ये प्रामुख्याने भरड धान्य आधारित उत्पादनाला कशा पद्धतीने प्रोत्साहन देता येईल यासाठी विशेष प्रयत्न करावेत असे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले तसेच भरड धान्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आलं यासाठी आष्टी येथील कृषी अन्न तंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य मोहोळकर सरांनी खूप आम्हाला सहकार्य केलं आणि त्यांनी भरड धान्याचे प्रदर्शन सुद्धा महाविद्यालय परिसरामध्ये भरवलं होतं हे सर्व राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा करण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी अतिशय उत्कृष्ट असे नियोजन करून हा सप्ताह यशस्वी केला.सुत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी सुहास गोपने यांनी केले तर आभार रवि सातभाई यांनी व्यक्त केले.









## जागतिक अन्नदिवस - भरडधान्य प्रदर्शन

**दिनांक - २०** ऑक्टोबर रोजी महाविद्यालयमध्ये राष्ट्रीय पोषण सप्ताह **निमित्ताने** भरडधान्य प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाचे **राष्ट्रीय सेवा** योजनेच्या वतीने आयोजन करण्यात आले होते यामध्ये प्रामुख्याने भरड धान्य आधारित उत्पादनाला **कशा पद्धतीने** प्रोत्साहन देता येईल यासाठी विशेष प्रयत्न करावेत असे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. तसेच भरड **धान्याचे महत्त्व** विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. यासाठी आष्टी येथील कृषी अन्न तंत्र महाविद्यालयाचे **प्राचार्य मोहोळकर** सरांनी खूप आम्हाला सहकार्य केलं आणि त्यांनी भरड धान्याचे प्रदर्शन सुद्धा महाविद्यालय परिसरामध्ये भरवलं होतं हे सर्व राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा करण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी **अति**शय उत्कृष्ट असे नियोजन करून हा सप्ताह यशस्वी केला.









# यशाची गुरूकिल्ली

२७ ऑक्टोबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये यशाची गुरूकिल्ली या नावाचा उपक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला होता या कार्यक्रमासाठी अहमदनगर येथील प्रसिद्ध उद्योजक माननीय धुमाळ साहेब हे आलेले होते तसेच त्यांच्या समवेत कडा येथील प्रसिद्ध शिक्षण तज्ञ भवर साहेब हे सुद्धा उपस्थित होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे सर होते आणि हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्लेसमेंट विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला होता, सर्व स्वयंसेवकांनी अतिशय उत्कृष्टरित्या याचं व्यवस्थापन केलं आणि स्वत: यशस्वी उद्योजक होण्यासाठीच्या नेमकी त्यावी काय असते? काय करावे लागते? याचा सुद्धा अभ्यास केला.









## डिजिटल डिटॉक्स दिन

झेप फाउंडेशन व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल डिटॉक्स दिन निमित्त जुन्या काळात जीवन कसं होतं यांचा स्वयंसेवकांना अनुभव देण्यात आला. तसेच यावेळी सर्व स्वयंसेवकांनी एक शपथ घेतली की आम्ही जास्तीत जास्त तंत्रज्ञानापासून दूर न जाता कुठल्याही व्यसनास बळी पडणार नाही या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करणार नाही अशी शपथ घेतली यावेळी झेप फाउंडेशनचे पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सोपानराव निंबोरे सर्व कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते. सर्वांनी जुन्या काळातील टपाल पद्धती कशी होती त्याचीही माहिती घेतली. सर्वांना पत्र लेखन लावुन ते टपाल एकत्र केले. सर्वांनी जास्तीत जास्त वेळ मोबाईल पासुन दुर राहाण्याची प्रतिज्ञा घेतली.










## एड्स जनजागृती कार्यशाळा

९ डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने एड्स जनजागृती कार्यशाळा पथनाट्य घेऊन विद्यार्थ्यांमध्ये एड्स विषयी जागृती करण्याचे कार्य केले पथनाट्याच्या माध्यमातून एड्स कशा पद्धतीने प्रसार होतो व त्याचा प्रतिबंध कसा करता येतो याविषयी सुद्धा मार्गदर्शन या पथनाट्यद्वारे करण्यात आले. या वेळी पोस्टर्स मेकिंग स्पर्धा घेवुन एड्स जनजागृती करण्यात आली.










## कायदेविषयक साक्षरता शिबीर

दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये कायदेविषयक साक्षरता शिबिराचं राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आष्टी न्यायालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका आणि कायदेशीर शिबिराच्या उद्घाटक म्हणून माननीय मुख्य दिवाणी न्यायाधीश आष्टी मा. पी. जी. इनामदार ह्या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. एम के पाटील सर, मा. यशस्वी उत्कर्ष हे उपस्थित होते. त्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष किशोर हंबर्डे हे होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी सुहास गोपने यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी खूप मेहनत घेतली.









# मराठी भाषा पंढरवाडा व नवीन वर्ष स्वागत समारंभ

दिनांक १ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये मराठी भाषा पंधरवडा निमित्त नववर्ष स्वागत व कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजनामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी सहकार्य केलं कार्यक्रमाचे पूर्ण नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांकडे होतं यामध्ये कवी महादेव लांडगे, कवी राजेंद्र लाड, कवी संजय शेळके यांनी आपल्या बहारदार कविता सादर केल्या त्याचप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेच्या काही स्वयंसेवकांनीही आपले काव्य प्रतिभा या ठिकाणी दाखवली.









## एड्स जनजागृती शिबीर

१२ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये एड्स प्रतिबंधक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी आष्टी तालुका ग्रामीण रूग्णालय व ट्रामा केअर सेंटर चे प्रमुख डॉ टेकाडे, जयचंद नेलावडे, महाविद्यालय प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे हे उपस्थित होते. यावेळी एड्स जनजागृती वर पोस्टर्स बनवण्याची स्पर्धा घेण्यात आली, रांगोळी स्पर्धा घेण्यात आली तसेच एड्स प्रतिबंधक शपथ घेऊन कार्यक्रम यशस्वी झाला









## राज्यपाल ब्रिगेड आव्हान २०२३ - आपत्ती व्यवस्थापन शिबीर

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली या ठिकाणी राज्यपाल ब्रिगेडचा आपत्ती व्यवस्थापन शिबिर दिनांक २५ डिसेंबर २०२३ ते ३ जानेवारी २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेले होते या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना बीड जिल्हा कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. रवी सातभाई यांनी बीड जिल्ह्याचे नेतृत्व केले.














## राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व सावित्रीबाई फुले संयुक्ती जयंती - वकृत्व स्पर्धा

दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये राजमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धेचा आयोजन करण्यात आलेला होता. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने हा संपूर्ण कार्यक्रम आयोजित केलेला होता आणि सर्व स्वयंसेवकांनी सुद्धा अतिशय उत्कृष्टरित्या या कार्यक्रमांमध्ये आपला सहभाग नोंदवून पारितोषिक मिळवले होते त्यावेळी प्रमुख परीक्षक म्हणून डॉ. संभाजी ओहोळ, धोंडे महाविद्यालय कडा डॉ. राम बोडखे हे उपस्थित होते.














## विद्यापीठ नामविस्तार दिन

१४ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. सचिन कल्याणकर हे उपस्थित होते त्यांनी विद्यापीठाच्या नामविस्ताराचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विद्यापीठाशी असलेला संबंध यावर विस्तृत भाष्य केले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा अविनाश कंदले यांनी अध्यक्ष स्थानावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यापीठ नामविस्तार चळवळीचा आवर्जून उल्लेख केला आणि त्यांच्या विद्यार्थीदशेतील आठवणींना उजाळा दिला यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.










# राष्ट्रीय मतदार दिन

दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय मतदार दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला या कार्यक्रमाच्या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी मतदार म्हणून मतदारांची विविध कर्तव्य कशा पद्धतीने पार पाडता येतील यासाठी मार्गदर्शन करण्यात आले आणि सर्वांना आठरा वर्ष पूर्ण झाल्यानंतर मतदानासाठी मतदाता म्हणून नाव नोंदणी करावी. असे आवाहन करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी शपथ घेऊन आम्ही भारतीय लोकशाहीच्या संरक्षणासाठी कटीबद्ध आहोत. अशा पद्धतीची प्रतिज्ञा घेतली. लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. भगवान वाघमारे, यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सखोल असे



मार्गदर्शन केले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे हे अध्यक्षस्थानी होते. तर कार्यक्रमाधिकारी रवि सातभाई यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. यावेळी सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.







# कॅन्सर जनजागृती कार्यशाळा

२५ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजने विभागातर्फे कॅन्सर अवेअरनेस प्रोग्रामची आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमांमध्ये कॅन्सर विषयी व कॅन्सर आजाराच्या गांभीर्याविषयी विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले कॅन्सरचा कशा पद्धतीने उपचार करता येतो आणि कॅन्सर भाविकांमध्ये कसा विघातक आहे याबाबत कॅन्सर तज्ञ माननीय श्री मिलिंद कामेडवार सरांनी विस्तृत मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे सर उपस्थित होते तर उपप्राचार्य अविनाश कंदले व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कार्यक्रमाधिकारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.










## प्रजासत्ताक दिन

२६ जानेवारी २०२४ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात **महाविद्यालयामध्ये** साजरा करण्यात आला यावेळी भारतीय **प्रजासत्ताक** आणि भारतीय लोकशाही सुदृढ करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी व सर्व प्राध्यापकांनी शपथ **घेतली** आणि भारतीय लोकशाहीचे संरक्षण कशा पद्धतीने करता येईल याविषयी प्राध्यापक डॉक्टर वांढरे सर यांनी मार्गदर्शन केले यावेळी आष्टी व्यापारी **संघटनेचे** अध्यक्ष सुखलाल मुथाजी आष्टी डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ मधुकर हंबर्डे हे उपस्थित होते. **कार्यक्रमाचे** अध्यक्ष स्थानी संस्था अध्यक्ष किशोर हंबर्डे हे होते.









# गुंतवणूक मार्गदर्शन शिबीर

१२ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये गुंतवणूक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना गुंतवणूक कशा पद्धतीने करावी गुंतवणुकीचे फायदे काय आहेत आणि भविष्य काळामध्ये नेमका कसल्या पद्धतीने आणि कुठे कुठे गुंतवणूक केली पाहिजे या पद्धतीचे विस्तृत असे मार्गदर्शन करण्यात आले.









# छ.शिवाजी महाराज जयंती

१९ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती उत्सव कार्यक्रमांमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभागाची विभाग प्रमुख डॉ. सखाराम वाढरे यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. किशोर हंबर्डे हे उपस्थित होते. तर व्यासपीठावरती प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, सचिव अतुल



कुमार मेहेर, संचालक महेशजी चौरे हे उपस्थित होते.








## राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीर

एस.एस.टी. कॉलेज, उल्हासनगर या ठिकाणी आयोजित का राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघाचे नेतृत्व डॉ. रवी सातभाई यांनी केले हे शिबिर दिनांक १७ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी या दरम्यान आयोजित करण्यात आलेले होते.










## राष्ट्रीय विज्ञान दिन

२८ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी प्रयत्न केले होते. यामध्ये सर्वप्रथम विज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक वर्गांचा सन्मान करण्यात आला. त्यांना पुष्पगुच्छ देऊन सदिच्छा देण्यात आले आणि त्यानंतर विज्ञान दिवसाचे महत्त्व आणि राष्ट्रीय विज्ञान दिवस नेमका का साजरा केला




जातो? याबद्दल प्रा. अनंत खोसे प्रा. कारंडे यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंभोरे हे होते.







# जागतिक महिला दिन

९ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये म्हणजे आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ परिवारातील जेवढ्या महिला आहेत, त्या सर्व महिलांना महिला प्राध्यापिकांना एकत्र करून त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच सर्व विद्यार्थिनींनी भावी आयुष्य जगण्यासाठी संस्कार कसे जगता येईल, यासाठी संस्थेच्या संचालिका श्रीमती रत्नमाला हंबर्डे यांनी विशेष मार्गदर्शन केले.









## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील सेमीकंडक्टर प्रोजेक्टचे लाईव्ह उद्घाटन समारंभ

१३ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील सेमीकंडक्टर प्रोजेक्टच्या उद्घाटन समारंभाचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले या कार्यक्रमासाठी सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक हजर होते यावेळी महाविद्यालयाचे प्रा. सोपान निंभोरे उपप्राचार्य अविनाश कंदले राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रवी सातभाई, डॉ. सुहास गोपने सर उपस्थित होते.







## राजीव गांधी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट आयोजीत - युथ हेल्थ प्रोग्राम

१४ मार्च ते १६ मार्च यादरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या इम्प्लेंट ट्रेनिंग सेंटर अहमदनगर या ठिकाणी डॉ. रवी सातभाई यांनी राजीव गांधी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट यांच्या द्वारे आयोजित हेल्थ प्रोग्राम मध्ये सक्रिय सहभाग घेऊन प्रशस्तीपत्र प्राप्त केले.









# युवा संवाद कार्यक्रम

दिनांक १९ मार्च २०२४ रोजी के एस. के. महाविद्यालय, बीड या ठिकाणी आयोजित युवा संवाद कार्यक्रमात परीक्षक व गट समन्वयक म्हणून डॉ. रवी सातभाई हे उपस्थित होते यावेळी त्यांनी पंचप्रण वर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले स्पर्धेत प्रथम घेतली तिथे येणाऱ्यांना पुरस्कार प्रदान केला व सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र दिले यावेळी राष्ट्रीय सेवा योजना चे जिल्हा समन्वयक अरुण दैतकर महाविद्यालयाचे प्राचार्य शिवानंद शिरसागर सर राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयाने कार्यक्रमाधिकारी खाकरे सर हे उपस्थित होते.

**कार्यारंभ**

Wednesday 2024/03/20

## केएसके महाविद्यालयात रासेयो युवा संवाद कार्यक्रम उत्साहात

**प्रतिनिधी । बीड**

दि.१९ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने युवा संवाद मनोगत स्पर्धा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बीड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून एकूण बारा विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला होता. या निमित्ताने १९ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांनी युवा संवाद या कार्यक्रमा अंतर्गत उपस्थित विद्यार्थ्यांनी विकसित भारताचे ध्येय, गुलामीच्या सर्व खुणा पुसून टाका, आपल्या वारशाचा अभिमान बाळगा, एकतेचे सामर्थ्य, नागरीकांची कर्तव्ये आदी विषयावर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने युवा संवाद मनोगत कार्यक्रमात ताणभोगे रोहन, भोसले किर्ती, शिंदे अजय, शितल चव्हाण या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.शिवानंद क्षीरसागर, जिल्हा समन्वयक डॉ.अरूण दैतकार, गट समन्वयक डॉ.रवी सातभाई, कार्यक्रमाधिकारी डॉ.सोमनाथ लांडगे, उपप्रा.डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.सतीश माऊलगे, कमवि उपप्रा.डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, कार्यक्रमाधिकारी डॉ.पंडित खाकरे, डॉ.नागेश शेटे, डॉ.अन्सार उल्ला खान उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.अनिता शिंदे यांनी मानले.







## शहिद दिन

२३ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये शहीद दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी सर्व शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली याच दिवशी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय परिषद असल्यामुळे व्यवस्थापन परीक्षा सदस्य डॉ. खंदारे व प्रा. साठे सर यांची या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती होती.








NOT ME BUT YOU

राष्ट्रीय सेवा योजना

NATIONAL SERVICE SCHEME

